# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ३१/०१/२०२५ (शुकवार)**

**Afternoon**

---

## तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्धी साठी घेण्यात आली कार्यशाळा

**नरखेड** :— भारतीय न्याय संहिता —२०२३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता—२०२३ भारतीय साक्ष अधिनियम —२०२३ तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्‌धीसाठी दिनांक ३१/०१/२०२५ रोजी मातोश्री अंजनाबाई मुदांफळे महाविद्यालय नरखेड येथे कार्यशाळा आयोजीत करण्यात आलेली होती.

सदर कार्यशाळेत मा.श्री.पि.आर.पाटील सह. दिवाणी तथा फौजदारी न्यायाधिश, नरखेड, श्री. मोहीत पंचारीया सरकारी अभियोक्ता नरखेड, श्रीमती स्मिता चौधरी सरकारी अभियोक्ता नरखेड, श्री. ॲड. सुदेश मानकर विधी सेवा समीती पि.एल.व्हि, नरखेड, श्री. ॲड अजय नारनवरे अध्यक्ष तालुका वकील संघ, नरखेड, श्री.मुकेश तिवारी सदस्य तालुका वकील संघ, नरखेड सर,प्राचार्य मातोश्री अंजनाबाई मुंदफाळे महाविद्यालय नरखेड यांनी भारतीय न्याय संहिता —२०२३,भारतीय नागरीक सुरक्षा संहिता—२०२३, भारतीय साक्ष अधिनियम —२०२३ या तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्‌धीसाठी आयोजित कार्यशाळेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपरोक्त विषयाच्या अनुषंघाने एकुण दोन सत्रात कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहेत. सदर कार्यशाळेत पोलीस पाटील, महाविद्यालयीन विदयार्थी , जेष्ठ नागरीक,अंगणवाडी सेवीका, शिक्षक हजर होते. मा.श्री.हर्ष पोद्‌दार पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण,.श्री.रमेश धुमाळ,अप्पर पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामिण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेत आयोजन करण्यात आलेले होते.

उपरोक्त दोन्ही सत्रात श्री.बापु रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग काटोल, सपोनि श्री अजित कदम पोस्टे नरखेड, परि पोउपनि श्री विजय माळी पोस्टे जलालखेडा हजर होते.







## जुगार अड्ड्यावर धाड १,८८,१५०/— रूपयेचा मुददेमाल जप्त पोलीस स्टेशन जलालखेडा यांची कार्यवाही.

**पोस्टे जलालखेडा** :— दिनांक ३०/०१/२०२५रोजी जलालखेडा पोलीस पोस्टे हददीत पेट्रोलिंग करित असताना गोपनिय मुखबिराद्वारें माहीती मिळाली की, सामेश्वर किल्ला मंदीर परिसरात काही ईसम ५२ तासपत्यांची पैशांची बाजी लावून हारजीतचा खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहीती वरून जाम नदी व वर्धा नदी संगम काठावर जुगार अड्यावर कायदेशीर रेड केली असता, घटनास्थळा वरून आरोपी नामे—१) आसिफ रजाक दिवान, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. ४ आमनेर ता. वरूड जि. अमरावती २) हसन शेख शेख मुबारक, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ जलालखेडा ता. नरखेड पाहीजे आरोपी ३) मो.सा. क्र. एम.एच. ४० एम. ४५८३ चा चालक/मालक , ४) मोसा.क्र. एम.एच. ३१ डि.डब्ल्यु. ८५०४ चा.मालक/मालक ५) मोसा. क्र. एम.एच. ४० ए.एच. ८०७६ चा चालक/ मालक तसेच नगदी ८१५०/— रूपये,व तीन मोटार सायकल १) क्र. एम.एच. ४० एम. ४५८३, २) एम.एच. ३१ डि.डब्ल्यु. ८५०४, ३) एम.एच. ४० ए.एच. ८०७६ ४) ५२ ताशपत्ते कि. ००/— रूपये १,८०,०००/— रूपये व एकुण १,८८,१५०/— रूपयेचा. माल घटनास्थळावरून पंचासमक्ष जप्त करण्यात आला व आरोपीतांविरूद्ध पोलीस ठाणे जलालखेडा येथे १२ महाराष्ट्र जुगार कायद्यांन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर